जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.२३/०१/२०२४**
**दि.२२/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ६४/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | गणेश देवकाते,वय ३० वर्षे,रा.सदगुरु पार्क,केसनंद,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/१२/२०२३ रोजी पहाटे ०३/३० वा.पासुन ते ०६/०० वा.चे दरम्यान कटकेवाडी, सिल्वर ओक हॅाटेलचे बाजुला कंपनीचे तीन एकर क्षेत्रातील तार कपाऊंड मधुन वाघोली,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे काम करीत असलेल्या कटकेवाडी या ठिकाणी असलेल्या कंपनीचे तार कंपाऊड केलेल्या जागेत डिलीव्हरीसाठी पार्क करुन ठेवलेल्या पाच वाहनांमध्ये असलेल्या EXIDE कपंनीच्या एकुण १० बॅट-या ८०,०००-००/- रुपये किंमतीच्या कोणीतरी अज्ञात इसमाने स्वतःचे अर्थिक फायदयाकरीता चोरी करुन नेल्या आहेत. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, शिवले ८८८८२०१००० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २५/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३० वर्षे,रा.हांडेवाडी रोड,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०१/२०२४ रोजी १९/५५ वा.ससुन हॅास्पिटलचे इन गेटचे समोर रोडवर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कलेक्टर ऑफिस येथील बस स्टॅापवर उतरून ससुन हॅास्पिटलेचे इन गेटचे समोरुन पुणे स्टेशनकडे जात असताना,त्यांचे पाठिमागुन आलेल्या नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील मोबाईल २५,०००/- रुपये किमंतीचा जबरी चोरी करून नेला आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. रविंद्र गावडे ९५९४९९३१९९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४८/२०२४,भादविक ३७९,३४,५११ |
| **फिर्यादी** | बाळासाहेब गावडे,वय-४४ वर्षे,रा.वडगाव-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | १.अर्जुन किसनसिंग रजपुत,वय-२१ वर्षे,रा.आंबेगाव-बद्रुक,पुणे (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०१/२०२४ रोजी १७/४५ वा.११ वा माळा,गोल्ड टॅावर क्र.४६,ॲमनोरा पार्क,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे न्यु सोनाई ईलेक्ट्रीकल ॲण्ड इंजिनियरींग या ठिकाणी सुपरवायझर म्हणून काम पाहतात. त्यांचे कंपनीत ईलेक्ट्रीशन म्हणुन काम करणारे यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करुन,न्यु सोनाई ईलेक्ट्रीकल ॲण्ड इंजिनियरींग या कंपनी मधुन ३१,४००/- रुपये किंमतीचे कॅापर वायर स्वतःच्या फायदयाकरीता चोरी करुन घेवुन जात असताना आ.क्र.१ हा मिळून आला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, आर.पी.बारटक्के ८७६७९२१०४१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ४४/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३४ वर्षे,रा.नांदेड फाटा,सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १६/०१/२०२४ रोजी २०/०० वा.सिंहगड रोड लोकमत भवन समोर,धायरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना फोटोग्राफी व व्हीडीओग्राफीची आवड असल्याने ते नांदेड गावातुन पायी त्यांचा कॅमेरा हातात घेवुन,सिंहगड रोडने धायरी ब्रिजकडे रोडने रात्रीचे फोटोसेशन करण्या साठी जात असताना,नमुद ठिकाणी त्यांचे पाठीमागुन आलेल्या यातील नमुद इसमांनी दुचाकी वरून त्यांचेजवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील पॅनासोनिक कंपनीचा कॅमेरा १,७०,०००/- अंदाजे रुपये किचा जबरी चोरी करून नेले आहे. (फिर्यादी हे मुंबई येथे गेल्याने त्यांनी पुण्यात येवुन आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरीक्षक, प्रविण जाधव ८७८८८३१६३० |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १६/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२५ वर्षे,रा.बोडकेवाडी फाटा,हिंजवडी,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/१२/२०२३ रोजी रात्रौ १०/३० वा. पासोडया विठोबा मंदीर रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह पायी जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचेजवळ येवुन,फिर्यादी व त्यांचे मित्राचे खिशातील दोन मोंबाईल ३०,०००/- रू किचे जबरी चोरी करून नेले आहे. (फिर्यादी हे गांवी गेल्याने त्यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, दळवी ९७६५३२२१११ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**